# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०६/०८/२०२६ (गुरूवार )**

........................................................................................................

## वाहन चोरीचे ३ गुन्हे उघड, ३ दुचाकी जप्त
## कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०६/०८/२०२६ रोजी कोंढाळी पोलीसांनी वाहन चोरीचे तीन गुन्हे उघड केले आहे.

पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत **दुचाकी चोरी बाबत दाखल असलेल्या अप. क्र. ४३०/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं., अप. क्र. ५१३/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं. व अप. क्र. ५३१/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं. या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना** कोंढाळी पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्हयात एका विधीसंघर्षग्रस्त बालाकाला ताब्यात घेतले. सदर बालकाने तिन्ही गुन्हयातील दुचाकी चोरी केल्याची माहीती निष्पन्न झाली.

**सदर कारवाई मध्ये पोलीसांनी पंचासमक्ष चोरीस गेलेली वाहने होंडा शाईन मोटारसायकल क्र एम एच ४० टी २५८० किंमती १०,०००/— रुपये सी डी डॉन मोटर सायकल एम एच ४० डी १०६ किंमती १०,०००/— रुपये, हिरो स्प्लेंडर मोटारसायकल एम एच ४० सी ई ५५७६ किंमती अंदाजे ३०,००० /— रुपये अशी एकूण ३ दुचाकी वाहने असा एकुण किंमती ५०,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**




## जलालखेडा पोलीसांनी घेतल्या  अवैध दारू विक्रेत्यांच्या घरझडती सातत्यपूर्ण कारवाईचा सकारात्मक परिणाम

पोलीस स्टेशन जलालखेडा :— दिनांक ०५/०८/२०२६ रोजी श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण,श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि श्री विनोद जांभळे, प्रभारी अधिकारी जलालाखेडा यांच्या नेतृत्वात जलालखेडा पोलीस स्टेशनच्या पथकाने आंबाडा, ताराउतारा व थडीपवनी परिसरातील अभिलेखावरील अवैध दारू विक्रेत्यांच्या पंचासमक्ष कायदेशीर घरझडती घेतल्या.

या कारवाईदरम्यान कोणत्याही ठिकाणी अवैध दारू अथवा दारू विक्रीशी संबंधित साहित्य आढळून आले नाही. स्थानिक नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आंबाडा परिसरात मागील दोन ते तीन दिवसांपासून अवैध दारू विक्री पुर्णपणे बंद असल्याचे निदर्शनास आले आहे. मागील काही दिवसांपासून जलालखेडा पोलिसांनी अवैध दारू विक्रीविरोधात सातत्याने केलेल्या कारवाईचा सकारात्मक परिणाम म्हणून आंबाडा परिसरात अवैध दारू विक्री बंद झाल्याचे प्राथमिक माहितीवरून दिसून येत आहे. जलालखेडा पोलीस

**स्टेशनकडून परिसरात नियमित गस्त, रेकॉर्डवरील दारू विक्रेत्यांवर सतत लक्ष तसेच वेळोवेळी घरझडती घेण्याची कारवाई सुरूच राहणार आहे. परिसरात कोणत्याही प्रकारची अवैध दारू विक्री होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून कडक दक्षता घेतली जात आहे. नागरिकांनी अवैध दारू विक्रीबाबत कोणतीही माहिती असल्यास ती तत्काळ जलालखेडा पोलीस स्टेशनला कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.**

## पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत नेचर हिल्स लॉजिंग ॲन्ड रेस्टॉरेंट मध्ये वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यावर गुन्हा नोंद, एक आरोपी अटक, एका पिडीतेची सुटका, रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक :—** दिनांक ०४/०८/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, **पोलीस ठाणे रामटेक परिसरामध्ये शुभम चंद्रभान ठाकूर हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता महिला व मुलींना पैशांचे आमिष देवून देहव्यापारास प्रवृत्त करून नेचर हिल्स लॉजिंग ॲन्ड रेस्टॉरेंट हिवरा रोड रामटेक येथे लोकांकडून पैसे घेवुन अवैधरित्या कुंटनखाना चालवुन देहव्यापार करवुन घेत आहे.** रामटेक पोलीसांनी **नेचर हिल्स लॉजिंग ॲन्ड रेस्टॉरेंट रामटेक** येथे धाड टाकली असता **आरोपी शुभम चंद्रभान ठाकूर, वय २५ वर्षे, रा. गांधी पुतळा जवळ टाकडी भंसाळी, ता. सावनेर, जि. नागपूर हा मिळुन आला. त्याला लॉज मालकाबाबत विचारपुस केली असता तो स्वतः मालक असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष हॉटेलची पाहणी केली असता नमुद हॉटेल मध्ये एक पिडीत महीला मिळुन आली. आरोपी हे स्वतःच्या आर्थिक फायदयाकरिता नमुद महीलेला पैश्यांचे आमिष देवून रामटेक येथे बोलाविले, देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून जागा उपलब्ध करून देवुन तिच्याकडुन देहव्यापार करवुन घेत असल्याची माहीती पिडीतेने पोलीसांना दिली.

**पोलीसांनी घटनास्थळावरून ०१ ॲन्ड्रॉईड मोबाईलसह, रोख रक्कम १८९०/— रूपये, आणि इतर साहीत्य असा १,२२, १५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच मिळुन आलेल्या पिडीतेची सुटका करण्यात आली आहे. आरोपी शुभम चंद्रभान ठाकूर, वय २५ वर्षे, रा. गांधी पुतळा जवळ टाकडी भंसाळी, ता. सावनेर, जि. नागपूर**

**यांच्या विरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ३, ४, ५ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०८ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ४२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त पारशिवनी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक ०५/०८/२०२६ रोजी पारशिवनी पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा कुंवारा भिवसेन परिसर येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पारशिवनी पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) ईश्वर शेषरावजी तूपटे, वय ५५ वर्ष, रा. ठाकूर वार्ड रामटेक, त. रामटेक, जि. नागपूर २) बबलू सूरेश सांगोडे, वय ३१ वर्ष, रा. किरणापूर, त. रामटेक, जि. नागपूर ३) राम रतीराम बर्वे, वय ४० वर्ष, विर्नोबा भावे, वार्ड रामटेक, त. रामटेक, जि. नागपूर ४) देवा अर्जुन अंबादे, वय ५५ वर्ष, रा. टिळक वार्ड रामटेक, त. रामटेक जि. नागपूर ५) सूरेश नानाअप्पा ईसापूरे, वय ४६ वर्ष, रा. भगतसिंग वार्ड, रामटेक त. रामटेक, जि. नागपूर ६) अंकूश गणेश अहीरकर, वय ३५ वर्ष, रा. विनोबा भावे वार्ड रामटेक, त. रामटेक, जि. नागपूर ७) अंकीत भगवानजी कुंभरे, वय २८ वर्ष, रा. दूधाळा रामटेक, त. रामटेक, जि. नागपूर ८) संतोषी कूमार इंद्रसेन यादव, वय ४२ वर्ष, रा. जैन हॉस्पिटल समोर कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ४२,०००/—रूपये असा एकुण ४२,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०८ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०८ गुन्हे नोंद. एकुण ७४,२३५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

**दिनांक ०५/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ७४,२३५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

**पोलीस स्टेशन केळवद** येथे ६ आरोपी अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे गजानन चांगदेव धर्मे, वय ५० वर्ष, रा. शनिचरा वार्ड नं. ०७, कोंढाळी, ता. काटोल, जि. नागपूर हे अवैधरीत्या सट्टापट्टी चालवितांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी ४ आरोपी हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे पद्माकर देवराम कनीरे, वय ५४ वर्ष, रा. खैरगाव ता. नरखेड हा अवैधरीत्या सट्टापट्टी चालवितांना मिळुन आला .**पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे विनोद मधुकर डहारे, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. ५, मांढळ, ता. कुही हा अवैधरीत्या सट्टापट्टी चालवितांना मिळुन आला . **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे संजय रघुनाथ दानी, वय ४५ वर्ष, रा. ईतवारीपेठ नागपूर हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी नामे ८ आरोपी अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे ३ आरोपी हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २१ गुन्हे नोंद

दिनांक ०५/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, ताडी दारू, ईतर साहित्य असा एकुण २३,६३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २१ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन बोरी** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक येथे** १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे १० गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर येथे** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही येथे** १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड येथे** ४ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १२४२० मिली देशी दारू, २९ लिटर मोहाफुल दारू, २५० लिटर मोहाफुल सडवा, १० लिटर ताडी दारू, ईतर साहित्य असा एकुण २३,६३०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक<br>
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर<br>
यांच्या मान्यतेने